L.D.

माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २१/२०१७**

तक्रारकर्ता, श्री.साहेबराव रघुपती खडसे,
**संपादक, दैनिक पुर्णकाळ, कार्यालय चांदुर बाजार, ता.चांदुर बाजार, जि.अमरावती**

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती, ता.जि.अमरावती**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्र),**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती, ता.जि.अमरावती**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २१.०७.२०१६ | -- | २१.०१.२०१७ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.४७६६/२०१३ दि. २१.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.राजेश लाहोरे विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.दिनेश गायकवाड हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ४७६६/२०१३) मध्ये दिनांक २१.०७.२०१६ रोजी सुनावणी घेवून " विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, बांधकाम जि.प.अमरावती यांनी सर्व गटविकास अधिकारी, पं.स.अमरावती जिल्हा यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून अर्जदार यांना सद्यस्थितीत उपलब्ध असलेली माहिती द्यावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. " असे आदेश पारित केले होते.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांनी दि.२१.०१.२०१७ रोजी तक्रार दाखल करुन, द्वितीय अपील क्र. ४७६६/२०१३ यात दि. २१.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे आक्षेप नोंदविले आहे. प्रस्तुत आदेशात श्री.साहेबराव खडसे यांनी जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत, पंचायत समिती येथील गौणखणीज व उत्खनन व त्याबाबत भरण्यात आलेली रॉयल्टी इत्यादी बाबत माहिती विचारली असून ग्रामपंचायत व पंचायत समिती हे स्वातंत्र प्राधिकरण आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये माहिती संकलीत करुन देण्याची कुठलीच प्रक्रिया नाही असे सुस्पष्टपणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपिलकर्ता यांनी विचारलेल्या माहितीची व्यापकता लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (बांधकाम), जिल्हा परिषद, अमरावती यांनी सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अमरावती जिल्हा यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून अर्जदार यांना सद्यस्थितीत उपलब्ध असलेली माहिती द्यावी व अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे श्री.साहेबराव खडसे यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांचेकडून कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली एकूण ५१ पृष्ठांची माहिती प्रदान करण्यात आली असून त्याचा अनुपालन अहवाल सादर करण्यात आलेला आहे. यात पंचायत समिती, अचलपूर, पंचायत समिती, वरुड, चांदुर रेल्वे, तिवसा इत्यादी प्राधिकरणाकडून प्राप्त माहितीचा समावेश आहे. ही बाब लक्षात घेता, पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले असल्यामुळे प्रस्तुत प्रकरण निकाली काढणे योग्य ठरेल. मात्र असे करण्यापुर्वी तक्रारकर्ता यांनी माहिती अधिकार अर्जान्वये उपस्थित केलेला मुद्या म्हणजे पंचायत समिती सर्व व सर्व गावांचा विकास करण्यासाठी वापरण्यात आलेला गौणखणीज त्यावरुन भरलेली रॉयल्टी तसेच बिलांतून कपात केलेल्या रॉयल्टी रक्कम देयकाच्या शासनास जमा केलेल्या चलाण प्रत या विषयावरील उद्भवणाऱ्या विनंती अर्ज, तक्रार अर्ज, माहिती अर्ज इत्यादींची संख्या लक्षात घेता, सर्वच शासकीय प्राधिकरणाने विशेषत: बांधकाम विकास कामामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, रस्ते बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगर परिषद, पंचायत समिती तसेच सर्व जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, व सर्व तहसिलदार कार्यालय यांनी अशा सर्व प्रकरणांची माहिती कलम ४(१)(ख) अन्वये स्वयंप्रेरणेने घोषीत केल्यास किंवा उघड केल्यास गौण खणिज उत्खनन यावरुन उद्भवणाऱ्या तक्रारी किंवा अर्धन्यायीक स्वरुपाची प्रकरणे यावर बऱ्यापैकी अंकुश राहील व ही माहिती सर्वच नागरिकांना विनामुल्य प्राप्त झाल्यास प्रशासनातील पारदर्शकता व उत्तरदायीत्व अधिक सोईचे होईल ही बाब लक्षात घेता, तसेच मा. सर्वोच्च न्यायालयामधील मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, दिनांक १७, ऑगस्ट २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा, दिनांक १६.०२.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीबाबत सूचित करण्यात आले आहे. ही बाब लक्षात घेता, प्रस्तुत निर्णयाद्वारे वरील सर्व विकास कामात नेमलेल्या प्राधिकरणांना तसेच नियंत्रण ठेवण्याचे आदेश असणाऱ्या प्राधिकरणांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार १७ मुदयांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै) अद्ययावत करण्यात यावी तसेच कलम ४ व्यतिरीक्त आपल्या कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शीत करणे आवश्यक असलेली सर्व माहिती आपल्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी.

याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यात यावा, या निर्देशासह वरील तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येते.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०८.२०२३**

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा यांना आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत असून त्यांनी वरील परिच्छेद क्र. ३ नूसार कलम ४(१)(ख) ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सदर आदेशाची प्रत नोंदणीकृत टपालाने पाठवून त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा यांना आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत असून त्यांनी वरील परिच्छेद क्र. ३ नूसार कलम ४(१)(ख) ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सदर आदेशाची प्रत नोंदणीकृत टपालाने पाठवून त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

३) आयुक्त, महानगर पालिका अमरावती व अकोला यांना आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत असून त्यांनी वरील परिच्छेद क्र. ३ नूसार कलम ४(१)(ख) ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सदर आदेशाची प्रत नोंदणीकृत टपालाने पाठवून त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

४) जिल्हा नियोजन अधिकारी, नगर नियोजन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा यांना आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत असून त्यांनी वरील परिच्छेद क्र. ३ नूसार कलम ४(१)(ख) ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सदर आदेशाची प्रत नोंदणीकृत टपालाने पाठवून त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा यांना आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत असून त्यांनी वरील परिच्छेद क्र. ३ नूसार कलम ४(१)(ख) ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सदर आदेशाची प्रत नोंदणीकृत टपालाने पाठवून त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

६) कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा यांना आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत असून त्यांनी वरील परिच्छेद क्र. ३ नूसार कलम ४(१)(ख) ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सदर आदेशाची प्रत नोंदणीकृत टपालाने पाठवून त्यांचेकडून अनुपालन अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

जावक क्रमांक २३८ दिनांक **19 JAN 2024**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती